**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८**
**ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३**
**कार्यपत्रिका क्र. ५**
**सभावृत्तांत**

दिनांक :- १९/८/२०१५ वेळ :- दु. १२.१५ वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक १९/८/२०१५ रोजी दु. १२.१५ वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा. ॲड. चिंचवडे संदिप गुलाबराव - अध्यक्ष
२. मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३. मा.लोंढे गणेश नारायण
४. मा.शमीम पठाण
५. मा.चिंचवडेपाटील आश्विनी गजानन
६. मा.को-हाळे अनंत सुभाष
७. मा. शिंदे शितल उर्फ विजय गोरख
८. मा.साबळे छाया जगन्नाथ
९. मा.जगताप विमलताई सुरेश
१०. मा.बारणे निलेश हिरामण
११. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
१२. मा.ओव्हाळ शेखर अशोक
१३. मा.गायकवाड विनय उर्फ विनायक रमेश
१४. मा.कलाटे स्वाती मयूर

खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा. सुभाष माछरे - .क्षेत्रिय अधिकारी, मा.रविंद्र जाधव प्रशासन अधिकारी तथा सचिव सभाशाखा, , मा.रामदास तांबे – कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग , मा.सी.एन.धानोरकर – उपअभियंता, स्थापत्य , मा.एन.आर.निंबाळकर – उपअभियंता स्थापत्य, मा.संध्या वाघ, उपअभियंता , स्थापत्य मा.सी.बी.कोंडे – उपअभियंता, स्थापत्य, मा.भाऊसाहेब साबळे – उपअभियंता पाणीपुरवठा विभाग, मा.बोरावके डी.एच - उपअभियंता, पाणीपुरवठा विभाग, मा.सुधाकर कुदळे – उपअभियंता, जलनिसारण विभाग, श्रीम.पाठक ए.ए. - उपअभियंता, झोनिपु विभाग, मा.मिनानाथ इनामदार – लेखाधिकारी, श्री.जी.एस.देशपांडे – मुख्य आरोग्य निरिक्षक, इत्यादी.

सर्वप्रथम मा. सभाध्यक्ष ॲड. चिंचवडे संदिप गुलाबराव यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कामकाजास सुरुवात केली.

तदनंतर मा.शमीम पठाण यांनी पुढीलप्रमाणे सुचना मांडली

आजच्या प्रभाग समितीमध्ये भारताचे माजी राष्ट्रपती व भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम व बिहारचे व केरळचे माजी राज्यपाल रा.सु.गवई यांचे दु:खद निधन झालेने तसेच राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या पत्नी व मा.महापौर शकुतला धराडे यांच्या सासु यांचे दु:खद निधन झालेने त्यांना ध्दाजंली वाहणेत यावी.

सदर सुचनेस मा.झामाबाई बारणे यांनी अनुमोदन दिले.

त्याप्रमाणे दोन मिनिटे उभे राहून श्रध्दाजंली वाहणेत येवून तदनंतर मा. सभाध्यक्ष ॲड. चिंचवडे संदिप गुलाबराव यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कामकाजास सुरुवात केली.

अ) तदनंतर मागील कार्यपत्रिका क्र. ४, दि. १५/७/२०१५ रोजी झालेल्या सभेचा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.अध्यक्ष यांनी प्रकट केले.

तदनंतर **उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्रमांक ३ पिंपरी चिंचवड लिंकरोड येथील सर्व धर्मिय स्मशान भुमीमधील मुस्लीम दफन भुमी यांस कै.फकीर भाई पानसरे असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक ४ प्रभाग क्रमांक ५२ मधील नामफलक बोर्ड लावणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्रमांक ५ प्रभाग क्रमांक ५२ स.नं.१०७ चा ३/२ हा भाग खाणपडने व्यापलेले आहे परंतु सदर स.नं. हा खाणपड असूनही आर झोन करणेत आलेला आहे. तो आर झोन रदद करणेकामी व तो भाग खाणपड ठेवणेकामी आणि पर्यटन म्हणून आरक्षीत करणेत येवून विकसित करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्रमांक ६ पुलाच्या खांबाना म्युरल करणे, विदयुत रोषणाई करणे व चौकाचे सुशोभीकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्रमांक ७ प्रभाग क्रमांक ५३ वाकड येथील भुमकर वस्ती चौकास कस्तुरी चौक असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्रमांक ८ ताथवडे निंबाळकरनगर येथील बी.आर.टी.बसस्टॉपला निंबाळकरनगर बसस्टॉप असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्रमांक ९ प्रभाग क्रमांक ५३ वाकड येथे गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड २०१३ श्री महादेव श्रीपती भुजबळ असे नामफलक बसविणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्रमांक १० प्रभाग क्रमांक २० वाल्हेकरवाडी ते चापेकर चौक रस्त्यावरुन उजवीकडे बिर्ला हॉस्पीटलकडे जाणा-या चौकास श्री.नामदेव महाराज मार्ग असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्रमांक ११ मौजे-वाकड येथील भुजबळ चौकाजवळील स.नं.१६४ ला श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

ठराव क्र. २८ विषय क्र. १
दि. १९/८/२०१५ विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा. झामाबाई बारणे अनुमोदक: मा. स्वाती कलाटे

संदर्भ :- मा. झामाबाई बारणे यांचा दिनांक १७/६/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

विषय :- थेरगांव येथील स.नं.२२/५ मधील क्षेत्र १ हेक्टर ०० आर या मिळकतीचा आगाऊ ताबा पिंपरी चिंचवड मनपास अ, ब पत्राव्दारे ज्या जमीन मालकाच्या मालकीची जमीन त्यांनी आरक्षण क्रमांक ६२८ खेळाचे मैदानसाठी दिलेले आहे. सदर खेळाचे मैदानास कै.रामभाऊ मोरु बारणे व कै.बारकु मोरु बारणे असे नांव देवून नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

.

ठराव क्र. २९ विषय क्र. २
दि. १९/८/२०१५ विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा.विनायक गायकवाड अनुमोदक: मा. विमलताई जगताप

संदर्भ :- मा. विनायक गायकवाड यांचा दिनांक १७/७/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

मा.कार्यकारी अभियंता स्थापत्य यांचेकडील पत्र क्रमांक स्था/बप्र/काअ//१३/१६५/२०१५, दिनांक १९/८/२०१५ अन्वये मौजे-वाकड येथील भुजबळ चौकाजवळील व सर्व्हे नंबर १६४ येथील नव्याने विकसीत झालेला सब वे मनपाने विकसीत केलेला नाही. तसेच सदर बस वे ची जागा मनपाच्या मालकीची नाही. सबब मौजे वाकड येथील भुजबळ चौकाजवळील स.नं.१६४ येथील नव्याने विकसीत झालेल्या सबवेला कै.गोविंद नारायण भंडारे चौक असे नामकरण करणेकामीचा प्रस्ताव फेटाळण्यात येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ३० विषय क्र. ३
दि. १९/८/२०१५ विभाग – १) स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
२) वैदयकिय विभाग
सुचक : मा. छाया साबळे अनुमोदक: मा. विनायक गायकवाड

संदर्भ :- मा.छाया साबळे दिनांक १९/८/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड लिंक रोड येथील सर्व धर्मिय स्मशान भुमी मधील मुस्लीम बांधवांची स्मशान, दफन भूमी यांस कै.फकिरभाई पानसरे असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे. सदर ठराव कायम होणेची वाट न पहाता पुढील कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ३१ विषय क्र. ४
दि. १९/८/२०१५ विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा. यमुनाताई पवार अनुमोदक: मा. अनंत को-हाळे

संदर्भ :- मा. यमुनाताई पवार यांचा दिनांक १४/८/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक ५२ ताथवडे-पुनावळे मधील नागरीकांच्या मागणीनुसार पुढे नमुद केलेप्रमाणे १) सोनवणे वस्ती-१, २) सोनवणे वस्ती-२, ३) गजानन कॉलनी, ४) शारदा कॉलनी, ५) साई कॉलनी, ६) पाटील वस्ती, ७) सिध्दार्थ कॉलनी, ८) लोंढे वस्ती असे कॉलनी / वस्तींची नांवे असून, सदर नामफलक बोर्ड बसविणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ३२ विषय क्र. ५

दि. १९/८/२०१५ विभाग – १) नगररचना व विकास विभाग

२) स्थापत्य मुख्यालय

सुचक : मा. शेखर ओव्हाळ अनुमोदक: मा. विजय गोरख शिंदे

संदर्भ :- मा. शेखर ओव्हाळ यांचा दिनांक १९/८/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ५२ हददीमध्ये स्.न.१०७ चा ३/२ हा भाग खाणपडने व्यापलेला आहे. परंतु सदर सर्व्हे नंबर हा खाणपड असूनही आर झोन करणेत आलेला आहे. तो आर झोन रदद करणेत यावा व तो भाग खाणपडच ठेवणेत यावा. सदर भाग हा प्रभाग क्रमांक ५२ पुनावळे ताथवडेमध्ये येत आहे.

तरी सदर खाणपड भाग हा पर्यटन म्हणून आरक्षीत करणेत यावा. सदर भागात तसेच बोटींग क्लब, बर्ड व्हॅली प्रमाणे विकसीत करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत यआहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ३३ विषय क्र. ६

दि. १९/८/२०१५ विभाग – १) स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

२) विदयुत ब क्षेत्रीय कायारलय

सुचक : मा. शमीम पठाण अनुमोदक: मा. अॅड.चिंचवडे संदिप गुलाबराव

संदर्भ :- मा. शमीम पठाण यांचा दिनांक १९/८/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

चिंचवड चापेकर चौकातील गोल पिलर्स (खांब) भोवती क्रांतीवीर चापेकर बंधुच्या क्रांती कार्यातील निवडक घटनांचे चित्रण करणारे म्युरल तयार करणे तसेच विदयुत रोषणाई व संरक्षक कठडे तयार करुन चौकाचे सुशोभीकरण त्वरीत करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता त्यावर पुढील कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ३४ विषय क्र. ७

दि. १९/८/२०१५ विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.विनय उर्फ विनायक गायकवाड अनुमोदक: मा. अनंत को-हाळे

संदर्भ :- मा. विनय उर्फ विनायक गायकवाड यांचा दि.१९/८/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक ५३ वाकड येथील स.नं.३४ भुमकर वस्ती चौकास कस्तुरी चौक असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ३५ विषय क्र. ८
दि. १९/८/२०१५ विभाग – १) बी.आर.टी.एस. विभाग
२) पीएमपीएल विभाग
३) स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा.आश्विनी गजानन चिंचवडेपाटील अनुमोदक: मा. निलेश बारणे

संदर्भ :- मा. आश्विनी गजानन चिंचवडेपाटील यांचा दि. १९/८/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

ताथवडे निंबाळकरनगर रघुनंदन मंगल कार्यालय समोरील बी.आर.टी.बसस्टॉपला निंबाळकरनगर बसस्टॉप असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता पुढील कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे. आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

**ठराव क्र. ३६ विषय क्र. ९**
**दि. १९/८/२०१५ विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय**
**सुचक : मा.विनय उर्फ विनायक गायकवाड अनुमोदक: मा. अनंत को-हाळे**

**संदर्भ :- मा. विनय उर्फ विनायक गायकवाड यांचा दि.१९/८/२०१५ रोजीचा प्रस्ताव.**

**प्रभाग क्रमांक ५३ वाकड येथे गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड २०१३ श्री महादेव श्रीपती भुजबळ असे नामफलक (बोर्ड) बसविणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.**

**सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.**

ठराव क्र. ३७ विषय क्र. १०
दि. १९/८/२०१५ विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा.गणेश लोंढे अनुमोदक: मा. आशाताई सुर्यवंशी

संदर्भ :- मा. भाऊसाहेब भोईर यांचा दिनांक १९/८/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक २० चिंचवडेनगर वाल्हेकरवाडी ते चापेकर चौक रस्त्यावरुन उजवीकडे बिर्ला हास्पीटलकडे जाणा-या चौकास अदयाप कोणतेही नामकरण करणेत आलेले नाही. तरी सदर चौकास श्री संत नामदेव महाराज मार्ग असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ३८ विषय क्र. ११
दि. १९/८/२०१५ विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा.स्वाती कलाटे अनुमोदक: मा. निलेश बारणे

संदर्भ :- मा.स्वाती कलाटे यांचा दिनांक १९/८/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

वाकड येथील भुजबळ चौकाजवळील स.नं.१६४ ही जागा श्री. मोहन पांडुरंग कलाटे यांच्या मालकीची आहे परंतु या जागेला श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

वरील प्रमाणे सभेचे कामकाज झाले मा. ॲड. चिंचवडे संदिप गुलाबराव यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/-
[ॲड.चिंचवडे संदिप गुलाबराव ]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

पिंपरी चिंचव महानगरपालिका,
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बक्षे/सभाशाखा/२/कावि/१७२/२०१५.
दिनांक : ११ /०९ /२०१५

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव( सभाशाखा )
ब प्रभाग समिती

प्रत -सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना